असाही इतिहास! बीडचे ऐतिहासिक, सांस्कृतिक वैभव दीपवून टाकणारे!

मस्साजोग व अन्य प्रकरणांमुळे बीडचा 'बिहार' झाल्याची टीका विरोधक करीत असले तरी, बीडचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभव डोळे दीपवून टाकणारेच आहे. कोकणातील अनेकांची कुलदेवता असणारी अंबाजोगाईची योगेश्वरी देवी, बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असणारे परळी वैजनाथाचे मंदिर, मन्मथस्वामी मंदिर, राज्यातील सर्व साखर कारखान्यांना ऊस तोड कामगार पुरविणारा जिल्हा, प्रमोद महाजन आणि गोपीनाथराव मुंडे यांची भूमी अशा एक ना अनेक बाबी बीडच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणार्या आहेत. शून्याचा शोध लावणार्या आर्यभट्टचा जन्म बिहार की महाराष्ट्रात याबद्दल एकवाक्यता नाही. काही संशोधकांच्या मते त्यांचे जन्मस्थान बीड आहे. इसपू ४७६ साली अश्मक येथे त्यांचा जन्म झाला असून, हे स्थान बीड असल्याचे म्हटले जाते. त्यांची समाधी लिंबागणेशला आहे. थोर अंकगणिती, खगोलाचे अभ्यासक भास्कराचार्य हे बीडचे असल्याचे संशोधकांना वाटते. (चाळीसगावजवळ असणारे पाटण हे भास्कराचार्यांचे असल्याचा दुसरा मतप्रवाह आहे.) अगस्त ऋषींचे निवासस्थान गेवराई तालुक्यातील राक्षसभुवनला होते. 'महापरिनिब्बाणसूत' या प्राचीन बौद्ध धर्मग्रंथात दक्षिणेतील महत्वाचे महाजनपद म्हणून अस्मकचा उल्लेख होतो. 'अस्मक' या महाजनपदामध्ये बीडचा समावेश होतो. (संदर्भ : प्रा. सतीश सोळंके यांचे हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि बीड जिल्हा पुस्तक)

• मराठीचे आद्यकवी अंबाजोगाईचे

मराठीचे आद्यकवी मुकुंदराज हे अंबाजोगाईचे. ज्ञानेश्वरांच्या जन्माच्या आधी मुकुंदराजांना समाधी घेऊन ७५ वर्षे झाली होती. मुकुंदराजांनी 'विवेकसिंधू' या ग्रंथाद्वारे शंकराचार्यांच्या वेदांतावर निरूपणात्मक विवेचन केले आहे. मराठी भाषेत सर्वाधिक लेखन करणारे दासोपंत परम दत भक्त. दासोपंतांनी ४८ ग्रंथ लिहिले असून, 'दासोपंतांची पासोडी' म्हणजे त्यांच्या वायय मंदिराचा कळस म्हटले पाहिजे. ४० फूट लांब आणि चार फूट रुंद अशा कापडावर पंचीकरण,

अध्यात्मज्ञानाचा विषय चित्राकृतींतून मांडलेली ही पासोडी मराठी संतवाययात अनन्य, अपूर्व व एकमेवाद्वितीय अशीच म्हणावी लागेल. अंबाजोगाई येथे प्रदीर्घ काळ वास्तव करून त्यांनी तेथेच समाधी घेतली.

संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज हे वीरशैव लिंगायत परंपरेतील शिवयोगी होते. त्यांचा जन्म मराठवाड्यातील नेकनूर येथे झाला. कपिलधार येथे मन्मथ स्वामींची समाधी आहे. भगवानगड येथील वंजारी समाजाचे आराध्य दैवत भगवानबाबा यांचा जन्म पाटोदा तालुक्यातील सुपे घाट सावगाव येथील. बाबांचे उतराधिकारी भीमसेन महाराज हे नेकनूरचे. पाटोदा तालुक्यातील गहिनीनाथ गड येथे नवनाथापैकी एक असलेल्या गहिनीनाथांची संजीवन समाधी आहे. नाथ संप्रदायातील एक महत्वाचे तिर्थक्षेत्र म्हणून गहिनीनाथ गड प्रसिद्ध आहे. संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेले क्षेत्र आहे. रामगड येथील लक्ष्मण महाराजांनी भागवत धर्मासाठी आपले आयुष्य वेचले.

• शिवालयांची मोठी संख्या

अंबाजोगाईची योगेश्वरी देवी साडेतीन शक्तीपीठांपैकी एक आहे. एक हजार वर्ष जुने कंकाळेश्वर मंदिर, ऐतिहासिक खंडोबा मंदिर, ३०० वर्षापूर्वीची ७० फुटी दीपमाळ, परळी वैजनाथ येथील वैद्यनाथ मंदिर, इ.स.१५१२ मध्ये बांधण्यात आलेली खजाना विहीर, बीड व परळीत असणारी शिवालये, सौताडा येथील रामेश्वर मंदिर, शनिदेवाचे प्रथम पीठ म्हणून ओळखले जाणारे राक्षसभुवन, भारतातील २१ प्रमुख गणेशस्थानांपैकी एक असणारे नामलगाव येथील गणेश मंदिर, अधिकमासात पवित्र स्थान म्हणून ओळखले जाणारे पुरूषोतमपुरीचे मंदिर बीड जिल्ह्यातच आहे. किल्लेधारूर येथे राष्ट्रकूटकाळात बांधलेला भुईकोट किल्ला, कपिलधार धबधबा, नायगावचे मयूर अभयारण्य अशी कितीतरी स्थळे पाहण्यासारखी आहेत.

• राक्षसभुवनची लढाई आणि साडेतीन शहाणे

पेशवेकाळात निझाम विरूद्ध मराठे यांच्यात झालेली राक्षसभुवनची लढाई म्हणजे मराठ्यांची शौर्यगाथा. बीड जिल्ह्यात गोदावरीकाठी वसलेल्या राक्षसभुवन येथे थोरल्या माधवराव पेशव्यांनी निझामाचा पराभव केला. या लढाईमध्ये निजामाचे २२ सरदार कैद करण्यात आले होते. साडेतीन शहाण्यांपैकी एक शहाणा विठ्ठल सुंदर यांचा मृत्यू याच लढाईमध्ये झाला. विठ्ठल सुंदर यांची समाधी राक्षसभुवन येथे पुरातन महादेव मंदिराजवळ आहे. (पेशव्यांच्या दरबारात साडेतीन शहाणे होते, त्यातील सखारामबापू बोकील, दिवाण विठ्ठल सुंदर, देवाजीपंत हे तीन पूर्ण शहाणे तर नाना फडणीस अर्धे शहाणे होते. त्याचे कारण त्यांना लष्कराचे नेतृत्व करता येत नव्हते. नानांनी स्वत:च्या बुद्धिमत्तेवर मराठी राज्य तोलून धरले होते. पुण्यातील नाना वाडा आणि वाईतील मेणवलीचा वाडा ही नानांची स्मारकेच म्हणता येतील.)

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तालुका सचिव पदी शिवाजी कुरे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे २४ वे अधिवेशन माजलगाव येथे दि.२५ डिसेंबर रोजी झाले असून या अधिवेशनात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या माजलगाव तालुका सचिव पदी कॉम्रेड शिवाजी कुरे यांची निवड करण्यात आली आहे या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे २४ वे तालुका अधिवेशन माजलगाव येथे पार पडले अधिवेशनाचे ध्वजारोहण जेष्ठ सभासद साहेबराव फुलगे यांच्या हस्ते करण्यात आले या अधिवेशनात विविध ठराव पारित करण्यात आले आणि पुढील दिशा ठरवण्यात आली आणि सध्या जे तालुक्यात विविध प्रश्न निर्माण झालेले आहेत त्यावर पक्षाची भूमिका कणखरपणाने मांडून आंदोलन करण्याचे ठरवण्यात आले आणि पक्ष संघटन मजबूत करण्यात यावे असेही अनेक सभासदांनी आपले मत व्यक्त केले. तालुका अधिवेशनाचे उद्घाटन पक्षाचे जिल्हा सचिव कॉम्रेड अजय बुरांडे यांनी केले आणि येणाऱ्या काळात माजलगाव तालुक्यातील जास्तीत जास्त गावात पक्षाचा विस्तार करण्यात यावा यासाठी प्रयत्न करा असे आवाहन त्यांनी केले. गेल्या तीन वर्षातील कामकाजाचा अहवाल पक्षाचे तालुका सचिव मुसद्दीक बाबा यांनी मांडला त्यावर पक्ष सभासदांनी चर्चा करून काही सूचना केल्या व येणाऱ्या काळात पक्ष मजबूत करण्यात यावा असे मत मांडले.

यावेळी पक्षाची नवीन तालुका कमिटी निवडण्यात आली तालुका सचिव म्हणून शिवाजी कुरे यांची निवड करण्यात आली तसेच तालुका कमिटीचे सभासद म्हणून मुसद्दीक बाबा, सय्यद रफीक, संदिपान तेलगड, सुभाष डाके, रामा राऊत, सय्यद रज्जाक, सुहास झोडगे, पप्पू हिवरकर, कृष्णा सोळंके, मोहन जाधव, विनायक चव्हाण, आसाराम राठोड, लहू खारगे, बळीराम भुबे यांची निवड करण्यात आली आभार प्रदर्शनाने अधिवेशनाची सांगता करण्यात आली.

शासन दफ्तरी गुन्हे नोंद असणाऱ्यांचा शस्त्र परवाना रद्द करा ; जिल्हाधिकाऱ्यांमार्फत गृहमंत्र्यांना सामाजिक कार्यकर्त्यांचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात १२८१ शस्त्र परवाना धारकांपैकी २४५ जणांवर एक किंवा एकापेक्षा जास्त गंभीर गुन्हे असल्याची पोलिस ठाण्यात नोंद असुन जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वाळुमाफिया, अपहरण, खुन, खंडणी, मटका बहाद्दर , गोळीबार या सारखे गंभीर गुन्ह्यांची शासन दफ्तरी नोंद असलेल्या शस्त्र परवाना धारकांचे परवाने रद्द करण्यात यावेत तसेच तत्कालीन पोलीस अधीक्षक बीड अविनाश बारगळ यांनी गुन्हा नोंद असलेल्या २४५ शस्त्र परवाना धारकांची जिल्हा विशेष शाखेकडून माहिती घेऊन जिल्हाधिका-यांना

ऑक्टोबर मध्येच पाठवली होती. त्यावर तातडीने निर्णय घेऊन शस्त्र परवाने रद्द करावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, शेख युनुस च-हाटकर , शेख मुबीन,रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष (इंटक), माजी सैनिक बीड जिल्हाध्यक्ष आप, नितिन सोनावणे बीड जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना यांनी शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना लेखी निवेदनाद्वारे केली असून सोमवारी आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

बीड जिल्ह्यात जानेवारी २०२४ ते आक्टोबर २०२४ या गेल्या १० महिन्यात ३६ खुन, खुन करण्याचा प्रयत्न केल्याच्या १६८ तसेच गर्दी करून मारामारी करणे,दंगल घडवणे यासारखे ४९८ गुन्हे तसेच यापैकी ७ गुन्हे अजुनही उघड झालेले नाहीत.शिवाय बीड जिल्ह्यातील महिला ,मुली सुरक्षित नसुन १५६ अत्याचाराच्या घटना तर विनयभंग , छेडछाडीच्या ३८६ घटना घडल्याची पोलिस दरबारी नोंद आहे.बीड जिल्ह्यात सद्यस्थितीत १२८१ जणांकडे शस्त्र परवाना आहे.प्रत्येक परवाना देताना पोलिसांकडून संबंधित अर्जदाराची शहानिशा केली जाते. त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का? ?याची माहिती घेतली जाते.

एक लढा न्याय देण्यासाठी सर्वांनी उपस्थित रहावे सरपंच गणेश लांडे

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील केस तालुक्यातील मस्साजोग येथील संतोष अण्णा देशमुख यांची भर दिवसा अपहरण करून निर्गुण हत्या करणाऱ्या राक्षसी प्रवृत्तीच्या व्यक्तींना शिक्षा झालीच पाहिजे म्हणून व संतोष देशमुख यांना न्याय मिळावा आणि यापुढे भविष्यात कधीही अशी कृत्य करण्याची कोणाची हिंमत होऊ नये म्हणून उद्या होणाऱ्या बीड जिल्ह्यातील मूक मोर्चा मध्ये सर्व पक्षीय त्याचबरोबर सर्व जाती धर्मातील लोकांनी न्यायासाठी लढ्यामध्ये सहभागी व्हावे व एक माणूस म्हणून माणसाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

जाहीर प्रगटन

मा. श्री. अक्षय सं.जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नं. २८१/२०२४

ॲड. क्षीरसागर एस.पी. यांच्या मार्फत

किशोर नरहरराव कुलकर्णी व इतर वि. निरंक

अर्जदार : १. किशोर पि. नरहरराव उर्फ नरहरी कुलकर्णी (कडेपुरकर), वय ५६ वर्षे, धंदा - गुत्तेदारी, रा.नांदेवाली, ता. शिरुर कासार, जि. बीड, २. निर्मलाबाई भ्र. नरहरराव उर्फ नरहरी कुलकर्णी (कडेपुरकर) वय ८० वर्षे, धंदा शेती, रा. सदर,

अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत.

ज्यापोक्षा नरहरी काशिनाथ कुलकर्णी हे राहते घरी नांदेवली, ता. शिरुर कसार, जि. बीड येथे दिनांक २१/०५/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. हे की, त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २२/११/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०१/२०२५ ही आहे.

आदेशावरून.

शिक्का

(स्वाक्षरीत)

सहा. अधीक्षक

दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर का.

(स्वाक्षरीत)

क.लिपीक

मुलांना चांगल्या आणि वाईट स्पर्शाबद्दल शिकवणे ही पालकत्वाची आणि शिक्षणाची एक आवश्यक बाब : मिनाक्षीताई देवकते

छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयात गुड टच-बॅड टच प्रशिक्षण शिबीर संपन्न

बीड । प्रतिनिधी

वयात येत असलेल्या मुलींना काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे. कोणता माणूस कोणत्या हेतूने त्यांना स्पर्श करत आहे, हे त्यांना समजले पाहिजे. चांगल्या आणि वाईट स्पर्शाबद्दल शिकवणे ही पालकत्वाची आणि शिक्षणाची एक आवश्यक बाब आहे असे प्रतिपादन बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांनी केले.

बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व जय वैष्णवी सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयात इयत्ता ५ वी ते १० च्या विद्यार्थीनींना गुड टच-बॅड टच प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबीरात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एपीआय तथा दामिनी भरोसा सेलच्या वर्षा व्हगाडे या होत्या तर प्रमुख पाहुणे बालहक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या ॲड.प्रज्ञाताई खोसरे, पोलीस हवालदार अनुराधा गव्हाणे, दामिनी पथकाच्या शोभा जाधव, मुख्याध्यापक राऊतमारे सर, ॲड.प्रशांत देशपांडे, संपादक बाळासाहेब फपाळ यांची उपस्थिती होती. गुड टच - बॅड टच विषयी विद्यार्थीनींना प्रशिक्षण देतांना मिनाक्षीताई देवकते यांनी सांगितले की, तुमच्या परवानगी शिवाय तुमच्या शरीराला कोणी स्पर्श करू शकणार नाही. कोणत्याही स्पर्शाला नाही म्हणण्याचा अधिकार हा तुम्हाला आहे. सगळ्यात आधी मुलींना किंवा मुलाला हे सांगा की, जर एखाद्या व्यक्तीने केलेला स्पर्श तुम्हाला आवडला नाही तर त्याला बॅड टच म्हणतात. उदाहरणार्थ, जर एखादी व्यक्ती तुमच्या प्रायव्हेट पार्ट्सला चुकीच्या पद्धतीने हात लावत असेल तर तो बॅड टच आहे. एखादी व्यक्ती तुम्हाला प्रेमापोटी स्पर्श करत असेल किंवा डोक्यावर प्रेमाने हात फिरवत असेल किंवा आजी आजोबा जवळ घेतात तसे प्रेमाने गळाभेट घेत असेल तर त्याला गुड टच मानले जाते. एखाद्याने प्रेमाने काही खायला दिले किंवा एखादी आवडती गोष्ट दिली तर मुले किंवा मुली लगेच आनंदी होतात. तुमच्या या भुलण्याचा इतर लोक गैरफायदा घेऊ शकतात, हे समजावून सांगणे ही पाल्यांची जबाबदारी आहे. मुलींना सांगा की, जर एखाद्या बाहेरच्या किंवा अज्ञात व्यक्तीने एखादी गोष्ट देऊन किंवा तुम्हाला एखादे मोठे आश्वासन देऊन फसवण्याचा प्रयत्न केला तर अशावेळी जागरुक राहा.

दै.अलहिलाल समुहच्या पुरस्कार वितरण सोहळा २८ डिसेंबर रोजी दुपारी

संध्याकाळी अखिल भारतीय उर्दु कवी संमेलनाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

उर्दु दै.अलहिलाल समुह आपल्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी भव्य पुरस्का सोहळा आयोजित करत आहे. या सोबतच उर्दु रसिकांसाठी अखिल भारतीय उर्दु कवी संमेलनाचे आयोजनही करण्यात येत असुन यंदाचा हे दोन्ही कार्यक्रम दि.२८ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. दु.०४ वा. मिना फंक्शन हॉल या ठिकाणी भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ.सय्यद सलीम उपस्थित राहणार आहेत. तर पुरस्कार वितरण बीडचे लोकप्रिय आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्याहस्ते वितरीत करण्यात येणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणुन आ.सुरेश धस, आ.विजयसिंह पंडित, आ.प्रकाशदादा सोळंके, आ.नमिताताई मुंदडा, माजी आ.सुनिलदादा धांडे, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, शिवसेना शहरप्रमुख शेख निजाम, राष्ट्रवादीचे युवानेते राजेंद्र मस्के, भाजपाचे प्रदेश महामंत्री शेख सलीम जहांगीर, बीड रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब, पठाण-ए-हिंद चे संपादक पठाण अय्युब खान आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर विशेष उपस्थिती म्हणुन मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती राहणार असल्याची शक्यता आहे. या पुरस्कार कार्यक्रमात सायं दै.सिटीझनचे संपादक शेख मुजीब, बीड प्रसारचे संपादक समीर काझी यांना पत्रकारीता, समाजसेवक जावेद कुरेशी, ॲड. शेख शफीक भाऊ, शेख वकील अहमद, डॉ.शेख अब्दुल रऊफ, ईनामदार सरफाराजोद्दीन, मुसा खान यांना आदर्श व्यक्तीमत्व, मोहम्मद इब्राहीम अन्वरी यांना उर्दु मित्र, सिद्धीकी जुबेर यांना आदर्श खेळाडु तर शेख जावेद पाशा शेख मोहम्मद इलियास, सय्यद आमेर फराज, खतीब अजीमोद्दीन, मोमीन सलाहोद्दीन, मुफ्ती अतिख, काझी फरिदा, शेख हिना वहिद, शेख सुलताना, फारोकी रब्बानी यांना आदर्श शिक्षक तर रफीक बागवान व सय्यद कलीम अहमद यांना जिवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

डसेंबर व जानेवारीमध्ये डीबीटीव्दारे श्रावणबाळ / संजयगांधी योजनेचे अनुदान मिळणार

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या श्रावणबाळ/संजयगांधी योजनेचे अनुदान वितरण हे माहे डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५ चे अर्थसहाय्य थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे वितरीत करण्यात येणार आहे. उर्वरीत लाभार्थ्यांनी यांना पूर्वीच्याच पारंपारीक पध्दतीने बिम्स मार्फतच देण्यात येणार आहे. परंतु सदर योजनेचे माहे फेब्रुवारी २०२५ पासूनचे अर्थसहाय्य केवळ डीबीटी पोर्टलवर आधार व्हॉलिडेट असणाऱ्या लाभार्थीयांनाच वितरीत करण्यात येणार आहे तर उर्वरित आधार व्हॉलिडेट नसलेल्या तसेच डीबीटी पोर्टलवर लाभार्थ्यांची नोंदणी न केलेल्या लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य माहे फेब्रुवारी २०२५ पासून बंद करण्यात येणार आहे यांची लाभार्थ्यांनी नोदं घ्यावी, असे तहसीलदार कार्यालयाव्दारे कळविण्यात आलेले आहे. सदर डीबीटी पोर्टलवर नोंदणी करणे करीता लाभाथी यांचे खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:- डिबीटी करणेकरीताचा विहीत नमुन्यातील अर्ज, बँक पासबुक, आधारकार्ड, रेशन कार्ड, संजय गांधी योजनेचा लाभार्थी असल्यास दिव्यांगाचे प्रमाणपत्र/ मृत्युप्रमाणपत्र / दुर्धर आजारबाबतचे प्रमाणपत्र / परीत्यक्त्या असल्याबाबतचा न्यायलयाचा पुरावा. https://docs.google.com/forms/d/e/1FIpQLScXD6JuXDvDHw2HEg7D4GYZjaEeDMD-VfSKgueXyr3hjPšrb/viewform या संकेतस्थळावर स्वतः तलाठी यांचे मार्फत तहसिल कार्यालय संगायो विभाग बीड येथे माहिती भरावी, असे तहसील कार्यालय यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

मतदार संघाला सुजलाम सुफलाम केल्याशिवाय राहणार नाही

लोणी गावातील नागरिकांचे माझ्यावर प्रचंड विश्वासाचे नाते : आमदार सुरेश धस

लोणी । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातून प्रचंड मताधिक्याने निवडून आल्यानंतर अधिवेशन संपल्यावर मतदार संघातील पहिली भेट लोणी गावाला आमदार सुरेश आण्णा धस यांनी दिली. लोणी येथे नूतन विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे बांधकाम पूर्ण होऊन मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी सपत्नीक पूजेसाठी आमदार सुरेश

आण्णा धस व सौ. प्राजक्ताताई धस यांना पूजेचा सन्मान ग्राम स्थांच्या वतीने दिला होता. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन माजी आमदार साहेबरावजी दरेकर नाना हे उपस्थित होते.

याप्रसंगी लोणी ग्रामस्थांच्या वतीने भव्य दिव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते परंतु सरपंच संतोष देशमुख यांची क्रूर पद्धतीने हत्या झाल्यामुळे मी सत्कार घेणार नाही असे अण्णांनी स्पष्ट सांगितले.

याप्रसंगी लोणी गटातील श्री. ह भ प रामदास महाराज रक्ताटे, ह भ प अभिजीत महाराज निंबाळकर, ह भ प नारायण महाराज वाळके, ह भ प बाबा महाराज वाळके, श्री. उद्धव बापू दरेकर,मा. उपसभापती गोपाळ भाऊ रक्ताटे, शिवाजी पाटील वाळके, मोहन तात्या वाळके, पंचायत समिती सदस्य डॉक्टर सुभाष वाळके, गणप्रमुख रामदास अण्णा शेंडगे ,महबूब भाई जवान, श्री राजेंद्र चोभे ,श्री सोमनाथ वाळके, उद्धव पाटील मोडवे ,श्री संजय गुंड, अमोल गुंड, उध्दव पाटील वाळके,जयसिंग गव्हाणे, ह भ प बाळासाहेब बोडरे सर, सरपंच श्री ज्ञानदेव सासवडे सर, संजय रकताटे, बाळासाहेब कावरे, गण प्रमुख श्री राहुल सुरवसे, श्री जालिंदर चांदगुडे नेते, रेनकू आण्णा बेल्हेकर, भवर सर सरपंच,मा.सरपंच श्री. बाजीराव वाळके, सुभाष दादा भोसले, दादा शिंदे, सरपंच राजेंद्र खुरंगे, श्री शरद माखनकर, निवृत्त कर्नल बापूराव पवार, सोमनाथ बेल्हेकर, कृष्णा पवार, विशाल सासवडे, प्रवीण सासवडे, अविनाश खोमणे,मल्हारी भोसले,लोणी ग्रामपंचायत चे सरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटीचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मोटारसायकल वर फिरत मटका; माजलगाव पोलीसांचा झटका

माजलगाव । प्रतिनिधी

शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चालवला जाणाऱ्या मटका जुगारावर छापा टाकण्याची मोहिम पोनि.राहुल सुर्यतळ व त्यांच्या सहकारी पोलीस अधिकारी,कर्मचाऱ्यां कडुन राबवली जात असताना म टका बुक्की वाल्यांनी शकल लढवत त्यांच्या एजंट्स ला मोटारसायल वर फिरत मटका घेण्याची आयडीया दिली आहे.

पण या शकल वर मात करुन केसापुरी वसाहतीतील चर्च च्या बाजुला सय्यद बिलाल हुसेन रा.केसापुरी वसाहत, ता. माजलगाव हा त्याची मोटारसायल क्रं.एमएच-४४/ डब्लू ६६२५ वर बसुन लोकां कडुन पैसे घेऊन कल्याण मटका जुगारावर मटका खेळवत होता.

अशी माहिती २७डिसेंबर रोजी पोनि.सुर्यतळ यांना गोपनीय बातमीदाराने दिल्याने त्यांनी पोउपनि माकणे के.बी.,सफौ. मुंडे, पोह भंडाणे,चालक मस्के यांनी छापा टाकुण नमुद नावे इसमा कडुन मोटारसायल, दोन मोबाईल व नगदी रक्कम ५हजार,२१०रु असा एकुण ७७हजार,२१०रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन पुढिल कार्यवाही केली.

माजलगावात आर्ट ऑफ लिव्हींगचा भव्य सत्संग

माजलगाव । प्रतिनिधी

येथील आर्ट ऑफ लिव्हींग परिवारच्या वतीने चला करूया नविन वर्षाचे स्वागत गान, ध्यान, ज्ञान आणि संगीत सोबत हे ब्रिद वाक्य घेवुन वरिष्ठ प्रशिक्षक श्री. विजय भैय्या यांच्या सानिध्यात भव्य सत्संगाचे आयोजन दि. ३१ डिसेंबर रोजी सायं. ६ ते ८.३० या वेळेत करण्यात आले असुन याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या सत्संगास प्रमुख अतिथी म्हणुन वरिष्ठ प्रशिक्षक श्री. शरद भैय्या, श्री. भास्कर भैय्या, श्री. सुनिल मामा, श्री. नरेन भैय्या यांची उपस्थिती असणार आहे. सत्संगानंतर महाप्रसादाचे आयोजन भारत होके पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

नगरपालिकेने जिजाऊ – सावित्रीबाई जन्मोत्सव साजरा करावा

जिजाऊच्या लेकींची पालिका प्रशासनाकडे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

येत्या ३ जानेवारी व १२ जानेवारीला शहरातील जिजाऊ उद्यान येथे जिजाउ सावित्री जन्मोत्सव साजरा करण्यात यावा अशी मागणी आम्ही जिजाउंच्या लेकींच्या वतीने पालिका प्रशासनाकडे निवेदन देउन करण्यात आली आहे.

राष्ट्रमाता जिजाउ अखंड देशाचे आदर्श प्रेरणास्थान आहेत. त्यांचा जन्मोत्सव साजरा करणे ही नव्या पिढीसाठी प्रेरणा ठरेल. कार्यक्रमाचे आयोजन नगरपरिषदेच्या सहकार्याने व

सहभागाने करावे जेणेकरून शहरातील नागरिकांमध्ये ऐक्य, संस्कृती आणि राष्ट्राभिमान वृध्दिंगत होईल. तसेच कार्यक्रमासाठी परिषदेकडुन आवश्यक परवानगी, साहित्य व सोयी – सुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी पालिका प्रशासन व पोलिस प्रशासनाकडे आम्ही जिजाउंच्या लेकी या संघटनेकडुन करण्यात आली आहे.

शिधापत्रिका धारकांचा गहु, तादुंळ काळ्या बाजारात पोलीसांचा छापा: ५लाख, ५०हजार ची २५०पोते जप्त

माजलगाव । प्रतिनिधी

राज्य व केंद्र सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा खात्या कडुन शासन मान्य रेशन दुकानदारांच्या माध्यमातुन शिधापत्रिका धारकांना देण्यात येणारा ५लाख,५०हजार रु.किंमतीचा गहु,तांदुळ धान्य माफिया कडुन काळ्या बाजारात विक्री च्या उद्देशानं साठा केलेल्या गोदामा वर माजलगाव शहर पोलीसांनी छापा टाकुण जप्त केला. सदरच्या छापा प्रकरणी पोनि. राहुल सुर्यतळ यांनी दिलेल्या प्रसिद्धि पत्रकात नमुद केले आहे कि,त्यांना गोपनीय बातमी दिली कि,म ाजलगाव शहराच्या बायपास रोड

लगतचे साई लॉज च्या पाठी मागे. एका पत्र्याच्या खाजगी गोदामात उल्लेखित किंमतीचा गहु,तांदुळ असल्याच्या माहिती वरुन २५डिसेंबर रोजीच्या मध्यरात्रि छापा टाकुण त्या गोदामुता ५०वजाने २००पोते किंमत ४०रु. किलो प्रमाणे ४लाख,५०पोते तांदुळ प्रती किलो ६०रु प्रमाणे

पुरवठा अधिकारी तथा तहसिलदार यांच्या कडुन फिर्याद दाखल नाहि. ?– प्रकरणात पोलिसांनी त्यांचे काम केले पण पुरवठा अधिकारी तथा तहसिलदार माजलगाव यांनी वृत्त लिहिपर्यंत पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली नसल्याची माहिती न मिळाल्याने याचे रहस्य काय याची चौकशी जिपुअ.व जिल्हाधिकारी यांनी करुन सत्य काय याचा तपशिल जाहिर करण्यात यावा अशी मागणी जनते कडुन होत आहे.

१लाख,५०हजार रुपये. असे एकुण ५लाख,५०हजार रुपये किंमतीचे धान्य आढळुन आले. सदरील गोदाम शेख अमजद इब्राहिम रा.आझादनगर, माजलगाव यांच्या मालकिचे असल्याचे समजले आहे.सदर घटनेची माहिती तहसिलदार यांना देण्यात आली व पुरवठा अधिकारी यांच्या मार्फत त्या खाजगी गोदामाला सिल करण्यात आले. हा छपा जिपोअ. नवनित कॉवत, अतिरिक्त पोअ. चेतना तिडके, सपोअ. कमलेश मिना यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि राहुल सुर्यतळ, पोउपनि. के.बी .माकणे, सफौ.मुंजाबा कुव्हारे, पोह. माधव तोटेवाड, पोलिस अमललदार संतराम थापडे,सचिन मस्के यांनी केली.

आदित्य शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांचा पुन्हा अटकेपार झेंडा

राजस्थान राज्यात शासकीय मेडिकल ऑफिसर म्हणून बैरागी, पीजी मध्ये आकांक्षा महाराष्ट्रातून द्वितीय तर डॉ. संदीपान हजारे NEET MDS परीक्षेत प्रथम

डॉ.पूजाकुमारी बैरागी

डॉ.आकांक्षा काटकर

डॉ.संदीपान हजारे

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा आणि येथील तज्ज्ञ प्रचार्य, प्राध्यापक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याने विविध क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी कार्यरत आहेत. नुकत्याच या संस्थेच्या तीन आजी-माजी विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा संस्थेचा अटकेपार झेंडा फडकवला असून या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

आदित्य शिक्षण संस्थेमधील आदित्य दंत महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी बैरागी पूजाकुमारी सोहनदास २०१२-१३ या बॅच ची विद्यार्थीनी असून त्यांची राजस्थान राज्यात शासकीय मेडिकल (डेंटल)ऑफिसर म्हणून निवड झाली आहे. बैरागी पूजाकुमारी सोहनदास आदित्य शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असतांना दाखवलेली मेहनत

आदित्य शिक्षण संस्थेतून विद्यार्थी घडतात याचा अभिमान

आदित्य शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ आम्ही पुस्तकी ज्ञान देत नाहीत. येथे आलेल्या विद्यार्थ्यांना आयुष्यभर पुरेल अशी शिदोरी मिळते. शिक्षणाबरोबर स्पर्धा परिक्षा, क्रीडा, सांकृतिक ज्ञान घेऊन बाहेर पडलेला विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होतोच. आमच्या संस्थेत विद्यार्थी घडतात याचा अभिमान असून नुकतेच तीन विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवले आहे. त्यांचे संस्थेच्या वतीने अभिनदंन करण्यात आले. त्यांच्याकडून इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते. – डॉ आदित्य सारडा, संचालक, आदित्य शिक्षण संस्था

आणि समर्पण यासोबत येथील प्राध्यापकांनी केलेल्या मार्गदर्शनाम ुळे आज बैरागी यांनी गगन भरारी घेतली आहे. तर आदित्य दंत महाविद्यालयाची ऑर्थोडोंटिक्स आणि डेंटोफेशियल ऑर्थोपेडिक्स प्रथम वर्षीय पदव्युत्तर विद्यार्थिनी काटकर आकांक्षा ईश्वर ही म हाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिक (MUHS) पहिल्या वर्षाच्या हिवाळी पीजी परीक्षा मध्ये संपूर्ण म हाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक मिळवला आहे. याच बरोबर डॉ. संदीपान आत्माराम हजारे NEET MDS २०२३ प्रवेश परीक्षेमध्ये खठ १४८८ आणि इतर मागासवर्गीयांतून प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. त्यांचा प्रवेश शासकीय दंत महाविद्यालय नागपूर येथे Endodontics and Conservative dentistry शाखेत पदव्युत्तर शिक्षणासाठी झाला आहे.

श्री माऊली इंग्लिश स्कूलची राष्ट्रीय आदर्श गौरव पुरस्कार साठी निवड

पिंपळनेर । प्रतिनिधी

दुर्गा प्रेरणा सोशल फाउंडेश राष्ट्रीय फिनिक्स ग्लोबल अवॉर्ड यांचा वतीने महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा राज्यातील समाजाचा सर्वांगीन विकासासाठी व विविध सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांना दरवर्षी राष्ट्रीय आदर्श गौरव पुरस्कार दिला जातो या वर्षी या पुरस्कारासाठी श्री माऊली इंग्लिश स्कूल सांडरवण ता. जि. बीड या शाळेची निवड करण्यात आली आहे

श्री माऊली इंग्लिश स्कूल या शाळेची स्थापना २०१३ रोजी सांडरवण या ग्रामीण भागात झाली तेंव्हा पासून या शाळेची गुणवत्ता व सामजिक कामगिरी उल्लेनीय आहे. या शाळेत ग्रामीण भागातील गोरगरीब ऊसतोड मजुरांची मुले शिक्षण घेत आहेत शहरातील मोठ मोठ्या शाळेला लाजवेल असे गुणवत्ता पूर्ण शिक्षण या शाळेत दिले जाते सुसंकृत विद्यार्थी घडविणारी या भागातील हि एकमेव शाळा असून या शाळेने एक आदर्श आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे. या शाळेने अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले आहेत,या शाळेत सामाजिक तसेच शैक्षणिक वेगवेगळे उपक्रम राबविले जातात प्रत्येक उपक्रमात या शाळेचा सक्रिय सहभाग असतो . या शाळेचा कार्याची दखल घेऊन दुर्गा प्रेरणा सोशल फाउंडेशन चा महाराष्ट्र कर्नाटक गोवा राज्याचां राष्ट्रीय आदर्श गौरव पुरस्कारासाठी श्री माऊली इंग्लिश स्कूल या शाळेची निवड करण्यात आली आहे श्री माऊली इंग्लिश स्कूल चे संस्थापक श्री अंगद आबुज यांनी आनंद व्यक्त करत या पुरस्काराचे खरे मानकरी संस्थेचे संचालक श्री मुकुंद आबुज, अहोरात्र मेहनत घेणारे शाळेचे मुख्याध्यापक श्री विशाल मालखरे सर, शिंदे सर, पैठणे मॅडम, आबुज मॅडम, लोंढे मॅडम, मोरे मॅडम, लांडे मॅडम, मालखरे मॅडम, माळवदे मॅडम, गायकवाड मॅडम, लुचारे मॅडम, नरवडे मॅडम,रामेश्वर कांबळे, उत्रेश्र्वर नांदुरकर,अशोक उबाळे, मिनिनाथ आबुज, औदुंबर नांदुरकर, जगन पवार इत्यादी शाळेचे सर्व कर्मचारी तसेच सर्व मित्र परिवार व पालक हे आहेत अशी भावना व्यक्त केली

Shree Mauli English School, Sandarwan

हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत ऑस्ट्रिया हॉल कोल्हापूर येथे दिनांक २९ डिसेंबर रोजी प्रदान करण्यात येणार आहे राष्ट्रीय आदर्श गौरव पुरस्कारा साठी निवड झाल्याबद्दल श्री माऊली इंग्लिश स्कूल शाळेचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

डॉ.शिवप्रसाद चरखा यांच्या आयुर्वेदाने अर्णवला नवसंजीवनी

अशास्वत जीवनाचे शास्वत सत्य म्हणजे 'जीवन आणि मुत्यु' या मध्ये असलेले केवळ एका क्षणाचे अंतर होय आणि तो क्षण जर साधता आला नाही, तर माणसाच्या हातात उरते ती केवळ 'श्रद्धांजली', आणि तोच क्षण साधण्याची किमया केवळ डॉक्टरच करु शकतात. म्हणुन तर म्हणत असावेत डॉक्टर आणि देव या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. असाच एक अनुभव बीड शहरातील प्रगती घोळवे यांना आलेला आहे तो त्यांच्याच शब्दात....

माझे नाव प्रगती दत्तात्रय घोळवे आहे मी बीड मधील शिवाजी धांडे नगर बार्शी रोड बीड येथे राहते.. माझा मुलगा अर्णव दत्तात्रेय घोळवे हा १० वर्षाचा आहे. तो ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल बीड येथे इयत्ता ५ मध्ये शिकत आहे एके दिवशी त्याच्या अचानक पोटात दुखायला लागले मग मी त्याला आमच्या फॅमिली डॉक्टर कडे घेऊन गेले तिथे त्याची ट्रीटमेंट घेतली त्यानंतर त्याला एक दोन दिवस बरे वाटले पण पण नंतर पुन्हा दुखू लागले फरक पडला नाही नंतर त्रास वाढतच गेला मग मी त्यानंतर त्याला बीड मधील पोटाचे तज्ञ डॉक्टर यांच्याकडे पण दाखवले पण तिथेही त्याला कुठलाच फरक पडला नाही मग मी त्याला जालना येथे हॉस्पिटलला घेऊन गेले तिथे पण त्याची आठ दिवस ट्रीटमेंट सुरू ठेवली तिथे पण त्याला कुठलाच फरक पडला नाही औषध दिल्यानंतर थोडे दिवस बरे वाटायचे आणि नंतर परत तोच त्रास सुरू व्हायचा हळूहळू पोटाबरोबर उलटी पण सुरू झाली. उलटी झाल्यानंतर जेवण आत मध्येच राहायचं पण नुसते पाणी बाहेर पडायचे. त्याला दिवसेंदिवस जास्त त्रास व्हायला लागला. खूप चिडचिड पण वाढली त्याची शाळा पण बंद झाली होती सगळीकडे घेऊन मी त्याला फिरत होते पण त्याला कुठलाच फरक पडत नव्हता. काही दिवसानंतर मी त्याला पुण्याला घेऊन जायचा निर्णय घेतला तज्ञ असे गॅस्ट्रो सर्जन तिथे होते त्यांच्याकडे पण मी घेऊन गेले तिथे एमआरआय,सिटीस्कॅन, सगळ्या मोठमोठ्या टेस्ट केल्या रिपोर्ट मध्ये कुठलेच काहीच येत नव्हते.मग मी काय करावे हा विचार नेहमी डोक्यात यायचा मुलाचा त्रास पाहून मला पण खूप त्रास व्हायचा. नंतर त्याला आठ ते दहा दिवस संडास पण होत नसायची उलटी तर बंदच नव्हती जेवण जात नव्हते. डोकं दुखत होते, विकनेस फार वाढत चालला होता तो फार गळाल्यासारखा झाला होता त्याला पाहून मला पण फार भीती वाटत होती मग काय करावे काय नाही काही सुचत नव्हते अचानक वाटायचे इकडे घेऊन जाऊ कोणी सांगितले त्या डॉक्टरकडे जा की मी तिकडे घेऊन जायचे कोणी सांगितले या डॉक्टरकडे जा की मी तिकडे घेऊन जायचे पण कुठलाच काही फरक पडत नव्हता शेवटी देवापुढे पण हात जोडले तिथेही कुठलाच फरक पडला नाही, वाटायचे काय आपल्या नशिबी आले हे... सगळे डॉक्टर करून झाले होते मग काय करावे काय करावे असाच विचार डोक्यात चालू होता अचानक एके दिवशी एक माझी मैत्रीण घरी आली तिने मला सांगितले आपण आयुर्वेदिक घेऊन पाहू मग तिने बीड मधील शिवप्रसाद चरखा हे डॉक्टर सजेस्ट केले मग आम्ही त्यांच्याकडे जाण्याचा निर्णय घेतला आम्ही दोघी अर्णवला घेऊन त्यांच्याकडे गेलो त्यांना सगळे सगळ्या प्रकार समजून सांगितला ते डॉक्टर पण थोडे कन्फ्युज झाले त्यांना पण ही केस नवीन होती त्यांच्यासाठी पण हा सगळा प्रकार नवीनच होता ...त्यांनी अगदी प्रेमाने सगळे ऐकून घेतले आणि आम्हाला सांगितले मी माझे शंबर टक्के प्रयत्न करतो . फक्त तुम्हाला संयम ठेवावा लागेल डॉ .साहेबांनी त्यांची ट्रीटमेंट सुरू केली.नंतर त्यांनी काही गोळ्या आणि रोज दोन टाईम बस्ती सुरू केली . रोजचा एक एक बदल ते पाहत होते. सुरुवातीला तर काही फरक जाणवत नव्हता .अर्णव चा त्रास काही कमी होत नव्हता .नंतर त्यांनी बस्ती पण बदलली गोळ्या पण बदलल्या ..मग असे करत करत एक महिना गेला . फरक काय पडत नव्हता . पोट पण दुखत होते उलटी पण थांबत नव्हती त्याची चिडचिड वाढत होती. मग एक महिन्याने थोडा थोडा फरक जाणवायला लागला. पहिले त्याला पंधरा-पंधरा दिवस संडास होत नव्हती. नंतर डॉक्टरांच्या व्यवस्थित ट्रीटमेंट मुळे आठ दिवसाला पोट साफ व्हायला लागले नंतर हळूहळू पाच दिवसाला आणि त्यानंतर हळूहळू नॉर्मल स्थितीवर आला..

डॉक्टर साहेबांनी अगदी संयमाने सगळे हाताळले व्यवस्थित ट्रीटमेंट दिली त्यामुळे अर्णव च्या तब्येतीमध्ये सुधारणा झाली अगदी बारकाईने अभ्यास करून डॉ. वरद चरखा यांनी डॉ.शिवप्रसाद चरखा यांच्या देखरेखीत योग्य उपचार केला. मी अगदी सगळीकडे घेऊन जाऊन सगळीकडे फिरून हताश झाले होते .पण अगदी देवा सारखे आम्हाला डॉ .चरखा साहेब भेटले आणि माझ्या मुलाचा इलाज झाला.मी आणि माझा मुलगा त्यांचे खूप खूप आभारी आहोत. धन्यवाद डॉ. वरद चरखा. असेच कार्य करत रहा तुमच्या उज्जवल भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा.

– प्रगती दत्तात्रय घोळवे,
शिवाजी धांडे नगर बार्शी रोड बीड